MHST090003412018

<u>नि.द.क्र. १३/२०१८ निशाणी क्र. ५२ वरील आदेश</u>

दरखास्तदार यांच्या वारसांनी नि.क्र. ५२ चा अर्ज वि.प.क्र. २अ यांचेविरुद्ध दावा अबेट झाला आहे तो रद्द होणेसाठी दाखल केला आहे. अर्ज व म्हणणे अवलोकन केले. दरखास्तदार व वि.प.तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

२. दरखास्तदार यांनी प्रस्तुतची दरखास्त शेत जमीनींचे वाटप करुन मिळणेकरीता जिल्हाधिकारी सातारा व घर मिळकतींचे वाटप न्यायालयीन आयुक्त यांच्याकडून करुन मिळण्याकरीता दाखल केलेली आहे. अशा प्रकरणी वि.प. मयत झाल्यानंतर त्यांच्या वारसांविरुद्ध दरखास्त चालवण्याचा अधिकार दरखास्तदारचे वारसांना आहे असे मला वाटते. सबब, मयत वि.प. क्र. २अ चे वारस याकामी अभिलेखावर घेणे आवश्यक व गरजेचे आहे. वि.प.क्र. २अ अरविंद गणपत उर्फ गणपती काळे हे दिनांक ११/०१/२०२२ रोजी मयत झाले आहेत. प्रस्तुत अर्ज दिनांक २३/१२/२०२२ रोजी दाखल करण्यात आला आहे असे दिसून येते. वि.प.क्र. २अ चे वारसांना मुदतीत समाविष्ट न केल्यामुळे या मयत वि.प.क्र. २अ विरुद्ध दावा अवसायन झाला आहे व त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यास विलंब झाला आहे. सदर अर्ज दाखल करण्यास दरखास्तदार यांना सर्वसाधारणपणे सहा महिन्यांहून अधिक विलंब झालेला आहे. सबब, सदर अर्ज खर्चासह

मंजूर होणेस पात्र आहे. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे :

**<u>आदेश</u>**

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. दरखास्तदार यांनी पुढील तारखेपर्यंत खर्चाची रक्कम रुपये २००/– (रु. दोनशे फक्त) जमा करावी, त्यापैकी रुपये १००/– (रु. शंभर फक्त) वि.प. यांना दयावेत व उर्वरित रक्कम शासनास जमा करण्यात यावी.

३. वरिल प्रमाणे पुर्तता झाल्यावर मयत वि.प.क्र. २अ यांचेविरुद्ध झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येतो.

ANKUSH ATMARAM PACHARNE

Digitally signed by ANKUSH ATMARAM PACHARNE
Date: 2023.10.03 17:40:44 +0530

स्थळ : कोरेगाव ( ए.ए.पाचरणे )

दिनांक : २९/०९/२०२३ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर कोरेगाव.